**दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई**
(दि विदर्भ **को– ऑप.बँक** लि., सम्मिलीत )
(शेडयुल्ड बँक)
सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग ९, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन,
फोर्ट, मुंबई ४०० ००१, पोस्ट बॉक्स नं.४७२
फोन नं. ९१-०२२-६९८०११०७/११५१/११५२/२२८७६०१५ ते २०, Website: https://mscbank.com.

## चल व अचल मालमत्ता विक्रीसाठी/भाडेतत्वावर देण्याबाबतची निविदा सुचना

दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप.बँक लिमिटेड मुंबई **"सेक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल असेटस ॲन्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) ॲक्ट २००२"** नुसार कर्जदार संस्थांच्या खालील नमुद मालमत्तेची विक्री/भाडेतत्वावर देणेसाठी मोहोरबंद निविदा मागवित आहेत.

**कर्जदार व मालमत्तेचा तपशिल खालील प्रमाणे :–**

अ) विक्री /भाडयाने द्यावयाची संस्था

| अ क्र | संस्थेचे नांव | क्षमता | मालमत्ता तपशील | विक्री साठी राखीव किंमत (रु.लाखात) | विक्रीसाठी बयाना रक्कम (रु. लाखात) १०% | कमीतकमी फिक्स व टॅगिंग भाडे प्रति वर्ष | भाडयापोटी बयाना रक्कम (रु.लाखात) | येणेबाकी ३०.११.२०२१ (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | अकोट तालुका सह. सूत गिरणी लि., जोगबन, ता–अकोट, जिल्हा–अकोला | १७२८० स्पिंडल | जमीन २५.१९ हे.आर.व इमारत | ९७५.९९ | ११४.७७ | रु.४.०० लाख प्रति महिना प्रथम वर्षासाठी दुसऱ्या वर्षापासून पुढे करार संपेपर्यंत प्रतिवर्षी १०% वाढ करावी लागेल. | १२.०० | ५८१९.४१ |
| | | | प्लॅन्ट ॲण्ड मशिनरी, स्क्रॅप व स्टोअरमाल | १७१.७० | | | | |
| | | | एकुण | ११४७.६९ | ११४.७७ | | | |
| | प्राप्त निविदामधून भाडयाने घेणाऱ्या निविदाधारकास प्रथम प्राधान्य राहिल. | | | | | | | |

**ब) भाडयाने देण्याच्या संस्था :–** **(रु.लाखात)**

| अ क्र | संस्थेचे नांव | क्षमता | मालमत्ता तपशील | कमीतकमी फिक्स व टॅगिंग भाडे प्रति वर्ष | भाडयापोटी बयाना रक्कम (रु.लाखात) | येणेबाकी ३०.११.२०२१ (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पांझराकान ससाका लि., भाडणे, ता. साक्री, जि. धुळे | १२५० मे.ट. प्रती. दिन | जमीन १००.९२ हे.आर.व इमारत<br>प्लॅन्ट ॲण्ड मशिनरी, स्क्रॅप व स्टोअरमाल | १ते २ वर्ष रु.०.५० कोटी प्रति वर्ष<br>३ऱ्या वर्षी रु.१.०० कोटी<br>४ ते ५ वर्ष रु.२.०० कोटी प्रति वर्ष<br>६ व्या वर्षापासून पुढे करार संपेपर्यंत रु.३.०० कोटी प्रति वर्ष<br>तसेच टॅगिंग भाडे रु.१००/– प्रति मे.टन प्रति वर्षी | ४१.७० | ८४७४.८७ |
| २ | स.म.स्व.बापूरावजी देशमुख ससाका. लि., वेळा ता–हिंगणघाट, जि.वर्धा | २५०० मे.ट. प्रती.दिन | जमीन १८२.९५ एकर व इमारत<br>प्लॅन्ट ॲण्ड मशिनरी, स्क्रॅप व स्टोअरमाल | १ ते २ वर्ष रु.०.७५ कोटी प्रति वर्ष<br>३ऱ्या वर्षी रु.१.५० कोटी<br>४ ते ५ वर्ष रु.३.०० कोटी प्रति वर्ष<br>६ व्या वर्षापासून पुढे करार संपेपर्यंत रु.४.०० कोटी प्रति वर्ष<br>तसेच टॅगिंग भाडे रु.१००/– प्रति मे.टन प्रति वर्षी | ७५.०० | राज्य बँक १३४६०.७१<br>सहभागातील बँका ३३०५.३२<br>(३१.१२.२०१८) |

**विक्री व भाडयासाठीच्या अटी खालील प्रमाणे –**

१. उपरोक्त मालमत्ता 'जशी आहे आणि जिथे आहे, ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत' अशा अटीवर व ज्यास कोणतीही हमी, खात्री, बंधन, जबाबदारी वा प्रतिनिधीत्व शिवाय असलेल्या तत्वावर अ.क्र. अ–१ विक्रीसाठी किंवा भाडयाने देणबाबत व अ.क्र. ब–१ व ब–२ फक्त भाडयाने देण्यात येईल. चल–अचल मालमत्तेचे क्षेत्रफळ, संख्या इ. बाबत कोणतीही हमी, खात्री, जबाबदारी इ.बाबत प्राधिकृत अधिकारी जबाबदार असणार नाहीत. प्रा.फंड, शासकीय देणी, विज बिल, पाणी बिल, कामगार देणी, इत्यादी वा अन्य वैधानिक देणी (मागील, चालू सद्याची व भविष्यात निर्माण होणारी) सर्वदेणी भागविण्याची जबाबदारी खरेदीदाराची/भाडेकरुची राहिल.

२. अ.क्र. अ–१ची विक्रीची निविदा तक्ता अ मधील कॉलम नं.५ मधील राखीव किंमतीपेक्षा तर भाडयाची निविदा तक्ता अ मधील कॉलम नं.७ मध्ये किमान भाडयापेक्षा, अ.क्र.ब–१ व ब–२ संस्थांच्या भाडयाच्या निविदा तक्ता ब मधील कॉलम न.५ मध्ये व टेंडर फॉममधील परिशिष्ट क्र.२ मध्ये भाडेकॉलमध्ये नमुद फिक्सभाडे व टॅगींग भाडे रक्कमेपेक्षा जादा असणे तसेच विनाअट असणे आवश्यक आहे. निविदा भरताना ही बाब लक्षात घेणे जरुरीचे आहे. टेंडर उघडण्याच्या दिवशी प्राधिकृत अधिकारी प्राप्त फायनान्शियल बीडमधील निविदानिहाय रकमा सर्व इच्छुक खरेदीदारांना वाचून दाखविण्यात येतील. ५ पेक्षा जास्त निविदा प्राप्त झाल्यास राखीव किंमतीपेक्षा जास्त रकमेच्या निविदा असणाऱ्या प्रथम ३ क्रमांकाच्या निविदा धारकांना एकत्रित बसवून सर्वांसमक्ष जास्तीत जास्त बोली लावण्याची संधी देतील. त्यापैकी जास्तीत जास्त बोली लावणाऱ्या निविदाधारकाची निविदा, त्यांनी लावलेल्या बोलीची रक्कम फेरनिविदा म्हणून घेण्यात येईल. तसेच ५ पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास सर्व पात्र निविदाधारकांना एकत्रित बसवून सर्वांसमक्ष जास्तीत जास्त बोली लावण्याची संधी देवून फेर निविदेची ऑफर देवून उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करतील. एकदा दिलेला देकार कोणत्याही परिस्थितीत मुळ देकारापेक्षा कमी करता येणार नाही. सर्वोच्च निविदा भरणाऱ्या निविदाधारकास यशस्वी घोषित करतील. यशस्वी निविदाधारकास मालमत्ता स्वतःच्या नांवावर करुन घेण्यासाठी लागणारा खर्च उदा. मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क इ. तर भाडे कराराबाबत भाडे करार नोंदणीकृत करणेबाबत सर्वखर्च भाडेकरुस करावा लागेल.

३. विक्रीच्या निविदा सोबत अ.क्र.अ–१साठी बयाणा रक्कम रु.११४.७७ लाख आणि भाडयासाठी रु.१२.०० लाख तसेच अ.क्र.ब–१चे भाडयासाठी रु.४१.७० लाख व अ.क्र.ब–२साठी बयाणा भाडयासाठी रु.७५.०० लाख रक्कमेचा भरणा बँकेत निविदा सादर करणेपूर्वी आर. टी. जी. एस. द्वारे (RTGS/NEFT: IFSC:MSCI 0082002 A/c No.0002116900000010 A/c Name DIRR Head office) दि महाराष्ट्र स्टेट को. ऑप. बँक लि., मुंबई येथे जमा करणे आवश्यक आहे. अयशस्वी निविदाधारकांना बयाणा रक्कम त्या दिवशी किंवा पुढील दिवशी परत करणेत येईल. बयाणा रक्कमेवर व्याज देण्यात येणार नाही. प्राधिकृत अधिकारी भाडयाची /विक्रीची निविदा अंतिम करणेसाठी बँकेच्या मा.प्रशासक सभेत सादर करण्यात येईल.

४. विक्रीची/भाडयाची निविदा पुस्तिका (बीड डाक्युमेंट) बँकेचे मुख्य कचेरी, मुंबई येथील डीआयआरआर विभागाचे व्यवस्थापक, प्रादेशिक कार्यालय,नागपूर व प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांचेकडे दि.०५.०१.२०२२ ते दि.१९.०१.२०२२ या दरम्यान कार्यालयीन दिवशी (दुसरा व चौथा शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) सकाळी ११.०० ते सायं. ५.०० या वेळेत मिळतील.

तसेच निविदा पुस्तिका (बीड डॉक्युमेंट) बँकेच्या बेबसाईटवरुनही (Website: https://mscbank.com.) डाऊनलोड करुन भरता येतील. मात्र निविदा बँकेत सादर करणेपूर्वी बँकेत फॉर्मपोटी विक्रीच्या निविदेसाठी रु.२९,५००/– (जी.एस.टी.सह) तर व भाडयाच्या बीड डॉक्युमेंटपोटी रु.५९००/– (जी.एस.टी.सह) चा एन.ई.एफ.टी.द्वारे भरणे आवश्यक राहिल.

५. निविदा दाखल करावयाची अंतिम तारीख दि.१९.०९.२०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील. निविदा मुख्य कचेरी, मुंबई येथे दुसऱ्या मजल्यावरील ड्रॉप बॉक्समध्ये दाखल कराव्यात.

६. विक्री व भाडेतत्वासाठी संबंधित प्राप्त निविदा उघडण्याची तारीख २०.०९.२०२२ रोजी अ.क.अ–१ करीता ११.०० वाजता, अ.क्र.ब–२ करीता १२.०० वाजता, अ.क्र.ब–१ करीता १.०० वाजता, मुख्य कचेरी, दुसरा मजला, सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग ९, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, फोर्ट, मुंबई ४०० ००१, येथे उघडण्यात येतील.

७. मालमत्ता भाडयाने देणे/विक्री करण्याचे अधिकार सरफेसी कायदा–२००२ अंतर्गत प्राधिकृत अधिकारी यांना प्राप्त आहेत. त्यानुसार योग्य ते कारण देवून कोणतीही निविदा स्विकारण्याचा/रद्दबादल ठरविण्याचे, संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार बँकेच्या प्राधिकृत अधिकारी यांना राहिल.

८. इच्छुक खरेदीदार/भाडेकरु निविदाधारक दि.१२.०९.२०२२ ते दि.१३.०९.२०२२ या दिवशी कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत कारखाना/गिरणी स्थळी भेट देवून मालमत्तेची पाहणी करु शकतात.

९. प्रत्येक संस्थेच्या विक्री मालमत्तेच्या निविदा पुस्तिका (बीड डॉक्युमेंट) बँकेच्या (Website: https://mscbank.com.) वेबसाईटवरही दि.०५.०९.२०२२ ते दि.१९.०९.२०२२ पर्यंत उपलब्ध राहील. (यातील अटी/शर्ती विक्रीस /भाडेतत्वाच्या निविदेस लागू राहतील.)

१०. सर्व इच्छुक विक्री/ भाडेकरु निविदाधारकांनी ड्यु डिलिजन्स स्वतः स्वखर्चाने करुन घ्यावयाचे आहे.

११. उपरोक्त माहितीतील मुद्दे,अटी,शर्तीच्या स्पष्टतेसाठी बँकेच्या (Website: https://mscbank.com.) वेबसाईटवर आणि दै.लोकसत्ता व दैनिक फायनान्सियल एक्स्प्रेसमध्ये बँकेने दि.०५.०९.२०२२ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीतील माहितीचा आधार घ्यावा व ती अंतिम राहील.

१२. प्राप्त झालेले विक्री/भाडे बिड/टेंडर बँकेच्या मा.कार्यकारी समिती समोर अंतिम करण्यासाठी ठेवण्यात येतील व याबाबतचा निर्णय निविदाधारकास अलाहिदा कळविण्यात येईल.

**वैधानिक नोटीस**

कर्जदार आणि जामिनदार यांना सुचित करण्यात येते की, बँकेच्या एकूण कर्ज येणेबाकीचा भरणा निविदा उघडणेपूर्वी करावा. अन्यथा जप्त मालमत्तेची विक्री करुन कर्ज वसुली केली जाईल. तसेच विक्री प्राप्त रकमेतून संपूर्ण वसुली न झाल्यास उर्वरित कर्जबाकी व्याज व इतर खर्चासह आपणांकडून वसुली केली जाईल याची नोंद घ्यावी. यापुर्वीच ३० दिवसाची विक्री जाहिरात प्रसिध्द केली असल्यामुळे वैधानिक पुर्तता पुर्ण झाली आहे.

सही/–
( डॉ. अजित देशमुख )
व्यवस्थापकीय संचालक तथा प्राधिकृत अधिकारी
दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप.बँक लि., मुंबई

दिनांक :– ०५.०९.२०२२
ठिकाण :– मुंबई